दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | मंगळवार | 10 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 263 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4




Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

## राज्यात भाजपचा दबदबा कायम! 12 जिल्हा परिषद निवडणुकांत महायुतीची सरशी

# जिल्हा परिषद निकालांनी बदललं सत्तासमीकरण!

मुंबई | वृत्तसंस्था

राज्यभरातील 12 जिल्हा परिषद आणि 125 पंचायत समिती निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले असून, या निकालांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणाची दिशा स्पष्ट केली आहे. नगरपरिषद, नगरपालिका, महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदांमध्येही भाजपने वर्चस्व सिद्ध करत राज्यात 'दादा' असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

भाजपने 12 जिल्हा परिषदांमध्ये सर्वाधिक 225 जागांवर विजय मिळवत पहिला क्रमांक पटकावला आहे. त्याखालोखाल अजित पवार गटाने 165 तर शिवसेना शिंदे गटाने 162 जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेसला 55, शिवसेना ठाकरे गटाला 43, शरद पवार गटाला 26, मनसेला 2 तर 41 अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत.

राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपने महाराष्ट्रात मोठा विजय मिळवला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दोन्ही नेत्यांचे कौतुक केले आहे.

निवडणूक कोणतीही असो, महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातील जनतेचा मोदीजींच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणित NDA वर विश्वास आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणुकीत NDA मिळालेला प्रचंड विजय हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जी यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरील जनतेच्या विश्वासाचा विजय आहे अशी एक्स पोस्ट अमित शाह यांनी केली आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे.



### कोकणात शिंदे गटाची ताकद

**रायगड जिल्हा परिषदेत शिवसेना शिंदे गटाने 23 जागा जिंकत वर्चस्व राखले आहे. रत्नागिरीत तर शिंदे गटाने 41 जागांवर दणदणीत विजय मिळवत प्रतिस्पर्ध्यांना मोठा धक्का दिला आहे. सिंधुदुर्गात मात्र भाजपने 27 जागा जिंकत मोठा पक्ष होण्याचा मान मिळवला.**



### पश्चिम महाराष्ट्रात मिश्र निकाल

**पुण्यात अजित पवार गटाने सर्वाधिक जागा मिळवत आपली ताकद दाखवली, तर साताऱ्यात भाजप आणि अजित पवार गटात चुरस पाहायला मिळाली. सांगलीत शरद पवार गट पहिल्या क्रमांकावर राहिला असून भाजप दुसऱ्या क्रमांकावर आहे. सोलापूरमध्ये भाजपने 38 जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.**



### मराठवाड्यात भाजपची आघाडी

**छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव येथे भाजपने सर्वाधिक जागा मिळवत आपली पकड मजबूत केली आहे. लातूरमध्ये मात्र काँग्रेसने 23 जागा जिंकत पहिला क्रमांक पटकावला असून ही भाजपसाठी चिंतेची बाब मानली जात आहे.**

एकूणच या निकालांमधून महायुतीला ग्रामीण भागात मोठे बळ मिळाले असून, आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांसाठी हे निकाल अत्यंत महत्त्वाचे संकेत देणारे ठरत आहेत. विरोधकांसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा इशारा मानला जात आहे.

एकूणच, जिल्हा परिषद निवडणूक निकालांनी आगामी विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय रणधुमाळीची नांदी केली असून, सत्ताधाऱ्यांसाठी आत्मविश्वास तर विरोधकांसाठी नव्याने रणनीती आखण्याची गरज निर्माण झाली आहे.

- **महाराष्ट्रातल्या जनतेने शिवसेनेला भरघोस मते दिल्याने ग्रामीण भागातही आमचा पाया आता अधिक मजबूत होत चालला आहे हे दिसते. रायगड, रत्नागिरीच्या विजयामुळे कोकणातील जनता खऱ्या शिवसेनेच्या पाठीशीच आहे हे सिद्ध झालं असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.**
- **महाराष्ट्रातल्या जनतेने शिवसेनेला भरघोस मते दिल्याने ग्रामीण भागातही आमचा पाया आता अधिक मजबूत होत चालला आहे हे दिसते. रायगड, रत्नागिरीच्या विजयामुळे कोकणातील जनता खऱ्या शिवसेनेच्या पाठीशीच आहे हे सिद्ध झालं असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.**

# महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेतर्फे नवनिर्वाचित बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांचा सत्कार



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेच्या वतीने परळी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित बांधकाम सभापती प्राध्यापक पवन मुंडे यांचा सत्कार सोहळा पार पडला. या वेळी परळीतील असंघटित कामगारांचे प्रश्न, रखडलेली विकासकामे आणि आगामी कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमास महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेचे अध्यक्ष आयुब खान रहमान खान, सचिव जगदीश इगवे, सचिव नसीब खान, उत्तम तूसळे, सखाराम चौधरी, रेहान खान, सिराज भाई, महेश शिवगण, आरेफ शेख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ता जमीर शेख उपस्थित होते.

मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे कट्टर समर्थक तसेच भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक असलेले प्रा. पवन मुंडे यांनी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या काळापासून पंकजाताई मुंडे यांच्यासोबत काम करत जनतेची निष्ठेने सेवा केली आहे. वार्ड क्रमांक १४ मधून जनतेने त्यांना सलग दोन वेळा निवडून देत विश्वास व्यक्त केला असून आज ते परळी शहराच्या बांधकाम सभापतीपदी विराजमान झाले आहेत. उपस्थितीच्या समोर बोलताना प्रा. पवन मुंडे म्हणाले,

"परळीतील असंघटित कामगारांना न्याय मिळवून देणे हे माझे पहिले प्राधान्य आहे. कामगारांची प्रलंबित कामे वेळेत पूर्ण केली जातील. तसेच शहरातील रखडलेली विकासकामे तातडीने मार्गी लावून नव्या विकासकामांची सुरुवात करण्यात येईल."

या सत्कार सोहळ्यामुळे असंघटित कामगारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून परळी शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## 'रोहयो'ची प्रशासकीय मान्यता बंद; दलालांपासून दूर राहण्याचे गटविकास अधिकाऱ्यांचे आवाहन

**आष्टी प्रतिनिधी :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (रोहयो) नवीन कामांना सध्या प्रशासकीय मान्यता देणे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांनी आणि संभाव्य लाभार्थ्यांनी कोणत्याही दलालांच्या आमिषाला बळी पडू नये किंवा कोणालाही पैसे देऊ नयेत, असे जाहीर आवाहन आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली अनेकदा ग्रामीण भागात दलालांचा सुळसुळाट होतो. सध्या 'रोहयो'बाबतही अशीच स्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन आष्टीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी परिषदेपत्रकातून आव्हान केले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार



जलसिंचन विहिरी, शेततळे, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड आणि फळबाग यांसह ज्या सार्वजनिक लाभाच्या 'रोहयो'अंतर्गत येणाऱ्या योजनांच्या कामांची प्रशासकीय मान्यता सध्या थांबवण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून या कामांचे सांकेतिक क्रमांक काढण्याची प्रक्रिया सध्या बंद करण्यात आली आहे. जोपर्यंत हे क्रमांक उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत नवीन कामे मंजूर होऊ शकत नाहीत. त्यामुळे सध्या कोणतीही नवीन कामे मंजूर केली जात नसल्याने नागरिकांनी कोणत्याही नवीन कामाचा प्रस्ताव दाखल करू नये. योजना मंजूर करून देतो असे सांगणाऱ्या कोणत्याही मध्यस्थ किंवा दलालाला पैसे देऊ नयेत असे आवाहन गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

## बारावीच्या परीक्षांना आजपासून सुरुवात; न. प. चे शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांच्याकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

इयत्ता बारावीच्या परीक्षा आजपासून सुरू होत असून या परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना परळी वैजनाथ नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.इयत्ता बारावीच्या परीक्षास बसलेल्या सर्व विध्यार्थीनी आत्मविश्वासाने परीक्षा द्या असे आवाहन शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू होत आहे. आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन ठेपलेल्या या परीक्षांना विद्यार्थ्यांनी कोणताही ताण किंवा भीती न बाळगता आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे आवाहन परळी वैजनाथ नगर परिषद शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे त्यांनी केले.



माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा बारावीच्या परीक्षेला आज दि.१० फेब्रुवारी रोजी सुरूवात होत आहे. या परीक्षेसाठी परळी वैजनाथ शहर व तालुका ५०२५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झालेली आहे.

विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार ठेवून शांत आणि चांगल्या वातावरणात परीक्षा द्यावी. आपण मिळवलेले ज्ञान आणि मेहनतीवर विश्वास ठेवून यश संपादन करावे, असे सांगत त्यांनी परळीचे शैक्षणिक नावलौकिक अधिक उज्वल करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. सर्व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी परळी वैजनाथ नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या वतीने सभापती योगेश मेनकुदळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा

## आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक

**आष्टी (प्रतिनिधी)**

सावरगाव मायंबा येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळा १८ मार्च रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला वर्षातून एकदाच ही संजीवन समाधी भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली जाते. या पवित्र सोहळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो नाथभक्त उपस्थित राहत असतात.

या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक पार पडली. या बैठकीस पोलीस, महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, पाणीपुरवठा तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दर्शन रांग व्यवस्था, व्हीआयपी दर्शन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, मोफत अन्नदान, कावड व्यवस्था, मळी काढणे, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संजीवन समाधी उघडण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी ती पुन्हा झाकण्यात येते. या कालावधीत मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीवर गंगाजल व चंदनाने अभिषेक करण्यात येतो. यावेळी मोठी यात्रा भरत असून हा सोहळा नाथभक्तांसाठी श्रद्धा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरतो.

नाथ संप्रदायातील ही प्राचीन अध्यात्मिक परंपरा श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानली जाते. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा हे नाथ संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या संजीवन समाधी सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.



# शुद्ध वैचारिकतेतून आणि आचरणातून मानवतावादाची पायाभरणी शक्य : प्रा. डॉ. म. सु. पगारे

■ एरंडोल : प्रतिनिधी

दोन डोळे, दोन कान, एक नाक, दोन हात आणि पाय असा हाडामासांचा बनलेला माणूस म्हणजे खऱ्या अर्थाने माणूस नव्हे. माणसाचं माणूसपण त्याच्या विचारातून आणि त्याच्या आचरणातून झळकते. शुद्ध आणि वैश्विक विचार करणारी संस्कृती आणि संस्कार जर संबंध विश्वात जर जोपासले गेले तर मानवतावादाची पायाभरणी सहज शक्य आणि सुकर होईल असे प्रतिपादन प्रा. डॉ. म.सू. पगारे यांनी केले.

दि.०८फेब्रुवारी २०२६ रोजी सूर्योदय जेष्ठ नागरिक संघ एरंडोल येथे आयोजित,प्रा.वा. ना.आंधळे यांनी अहिराणी बोलीत अनुवादित केलेल्या 'बा,तथागता!' या विशाल कवितेच्या ग्रंथाचे व याच ग्रंथावरील 'विवेकी जाणिवांचा प्रज्ञा प्रवाह' या समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन बौद्ध तत्वज्ञानाचे अभ्यासक व मेडिटेशन तज्ज्ञ आचार्य मनोहरजी सुरदास यांचे शुभहस्ते संपन्न झाले.त्यावेळी सुप्रसिद्ध मानवतावादी विचारवन्त,समीक्षक,साहित्यिक तथा कवी प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपले विचार श्रोतृ समुदायासमोर मांडलेत.





ते आपल्या चिंतनातून पुढे म्हणाले की, बुद्ध तत्त्वज्ञाना तून खऱ्या अर्थाने मानवतावाद प्रस्फुटित होईल. कारण बुद्धतत्त्वज्ञानामध्ये सत्याला भिडण्यासाठीची भूमिका पहिल्यांदा घ्यावी लागते आणि सत्यान्वेषी प्रवास जीवनाच्या अखेर पर्यंत करावा लागतो. त्यासाठीची प्रत्येक माणसाची आचारसंहिता, वैचारिकता आणि माणूसपणाचे सर्व कांगोरे घासून पुसून चकचकीत करावे लागतात. शुद्ध माणूस होण्यासाठी, परिशुद्ध होण्यासाठी आणि परिशुद्ध असलेला माणूस हा खऱ्या अर्थाने मानवतावादाचा निदर्शक आहे. जात-पात, उच-नीच, काळा-गोरा या भेदांच्या भिंती संपूर्णपणे कोलमडून नव्या युगामध्ये बुद्धतत्त्वज्ञानातसह मानवतावादाची माणसापरत्वे पेरणी व्हायला हवी आणि सबंध विश्वच बंधुभाव, न्याय, प्रेम, स्वातंत्र्य, मैत्री, करुणा, या युक्त गुणांनी उजळून निघायला हवे. बुद्ध तत्त्वज्ञानामध्ये 'माणूस' आणि माणसाचे 'मन' ही मानवतावादाची केंद्रवर्ती प्रयोगशाळा आहे असे म्हणता येईल. त्यासाठी मानवाच्या संस्कारक्षम मनावर वेगवेगळ्या पैलूंनी संस्कार करून मनाला परिशुद्ध करण्याचा प्रयत्न अखिल मानव जातीला खुणावत आहे. आज मितीला माणूस हे सगळे विसरत चाललेला आहे. असं दिसत असताना माणूस आणि माणूसकीची व्याख्या नव्याने करण्याची गरज भासली आहे. जगातील दुःखाचा नायनाट सुद्धा याच विचारातून करता येऊ शकतो, त्यासाठी मानवी मनाला संस्कारक्षम बनवण्याच्या अनुषंगाने परिशुद्तेकडे घेऊन जाता येईल आणि परिशुद्ध झालेले मन आपणा सर्वांना मानवतावादाचे सुखद रूप प्रकट करून देईल यातच मानवी जीवन कल्याणाचे ध्येय लपलेले आहे.मानवतावादाच्या अनुषंगाने 'बा, तथागता ' या अनुवादित साहित्यकृतीवर पावणे दोन तास चाललेल्या डॉ.पगारे यांच्या चिंतन वर्षावाने श्रोतावर्ग अक्षरशः मंत्रमुग्ध झाला. यावेळी प्रमुख अतिथी बौद्ध तत्वज्ञानाचे अभ्यासक तथा मेडिटेशन तज्ज्ञ आचार्य मनोहरजी सुरदास यांनी मानवी मनाच्या अवस्थांना हात घालीत षड्रिपु पासून कशी सुटका करावी व मानवी कल्याणाच्या वाटेने कसा प्रवास करावा.,यावर प्रकाश टाकीत 'बा,तथागता' हे विशाल काव्य मानवी जीवनासाठी दिपस्तंभासारखे कामी येईल हा विश्वास व्यक्त करीत डॉ.पगारे यांना मूळ मराठी साहित्यकृतीचे जनक म्हणून आणि प्रा.आंधळे यांनी या साहित्यकृतीचा अस्सल अहिराणीतून अनुवाद केला म्हणून दोघा कवींचे हे ऐतिहासिक काम असून ते विश्वकल्याणकारी असल्याचे म्हणत दोन्ही कवींचे त्यांनी अभिनंदन केले. या समारंभात समीक्षा ग्रंथासाठी लेखन करणाऱ्या समीक्षकांना शाल,समीक्षा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.त्यात डॉ.नरेंद्र बापूजी खैरनार (साक्री),डॉ.रमेश सूर्यवंशी(कन्नड),नानाभाऊ माळी(हडपसर,पुणे),डॉ. देवदत्त बोरसे(बागलाण नामपूर),कैलास पाटील(जळगाव),खेमराज पाटील(जळगाव),रमेश धनगर(गिरड-पाचोरा),डॉ.विजय शिरसाठ(चाळीसगाव), रमेश बोरसे(धुळे),सौ.रत्ना पाटील(फागणे),डॉ.माधव कदम(नंदुरबार),डॉ. वाल्मिक अहिरे(वडजी-भडगाव),

श्रीमती लतिका चौधरी(दोंडाईचा) यांचा सहभाग होता. बा, तथागता या विशाल काव्याचे अहिराणीअनुवादक व समीक्षा ग्रंथाचे संपादक प्रा.वा. ना.आंधळे यांचा सपत्निक सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. अनुवादाची भूमिका प्रास्ताविकातून स्पष्ट करीत अतिथींचा परिचय अनुवादक व संपादक प्रा.वा. ना.आंधळे यांनी करून दिला तर संपूर्ण कार्यक्रमाचे अतिशय मनोहारी सूत्रसंचालन प्रा.खेमराज पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन कवी निंबा पुना बडगुजर यांनी केले.संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन सूर्योदय जेष्ठ नागरिक संघाचे संचालक कवी पी.जी.चौधरी सर व कवी निंबा पुना बडगुजर,विनायक कुलकर्णी,कवी झांबरे प्रा.कैलास पाटील,डॉ. दीपक खरात, कमलनाम प्रतिष्ठानचे खजिनदार दिनेशभाऊ घुगे, सौरभ घुगे यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिवजयंती निमित्त दि.19 फेब्रुवारीपर्यंत व्याख्यानांचे आयोजन

येणाऱ्या शिवजयंतीनिमित्त मिशन आयएएस अमरावती या सेवाभावी संस्थेने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून त्यामध्ये पुस्तक प्रकाशन व व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहे. शिवजयंतीनिमित्त मिशन आयएएस तीन पुस्तकांचे प्रकाशन करणार असून ही पुस्तके मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये आहेत. पुस्तकांचे वितरण शिवभक्तांना विनामूल्य करण्यात येणार आहे.

शिवजयंतीनिमित्त मिशन आय ए ए ने पुण्याचे सुप्रसिद्ध वक्ते डॉ. प्रवीणकुमार शेंडे यांचे अमरावती नागपूर भंडारा अकोला बुलढाणा जिल्ह्यात व्याख्यानांचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. डॉ. प्रवीणकुमार शेंडे हे सुप्रसिद्ध वक्ते असून त्यांची आतापर्यंत संपूर्ण भारतात 7000 व्याख्याने झालेली आहेत. शिवजयंतीचे औचित्य साधून मिशन आय.ए. एस.ने त्यांना निमंत्रित केले आहे. मिशन आय ए एस. ने हे कार्यक्रम शासकीय ज्ञान विज्ञान संस्था जवाहर नवोदय विद्यालय यूनिक अकादमी चाणक्य फाउंडेशन वंजारी अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर पोदार इंटरनॅशनल स्कूल टायटन इंटरनॅशनल स्कूल तोमाई इंटरनॅशनल स्कूल या ठिकाणी नियोजित करण्याचे निश्चित केले असून त्या त्या ठिकाणी डॉ. प्रवीणकुमार शेंडे हे मार्गदर्शन




करणार आहेत. ज्या मान्यवर संस्थांना डॉ. प्रवीण कुमार शेंडे यांचे व्याख्यान आयोजित करावयाचे आहे त्यांनी अधिक माहितीसाठी मिशन आय ए एस चे संचालक प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे यांच्याशी 9890967003 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मिशन आय ए एस च्या प्रसिद्धी पत्रकातून करण्यात आले आहे. डॉ. प्रवीणकुमार शेंडे यांचे मानधन प्रवासखर्च निवास व भोजन व्यवस्था हा खर्च मिशन आयएएस उचलणार असून संबंधित संस्थांना कोणतेही कोणत्याही प्रकारचे मानधन किंवा प्रवास खर्च द्यावा लागणार नाही. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मिशन आय. ए. एस.नेआयोजित केलेल्या ह्या व्याख्यानाच्या उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

यापूर्वी देखील मिशन आयएएसने शिवजयंतीनिमित्त व्याख्यानांचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करून छत्रपती श्री शिवाजी महाराजांना आगळी वेगळी आदरांजली वाहिली आहे. दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या वक्त्यांना एका आठवड्यासाठी निमंत्रित करून व त्यांचे ठिक ठिकाणी कार्यक्रम आयोजित करून व पुस्तके प्रकाशित करून मिशन आयएएस शिवजयंती पारंपारिक पद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीने संपन्न करीत आहे. या उपक्रमासाठी मिशन आयएएस चे अध्यक्ष श्री ज्ञानदेव मोडक जाधव उद्योग समूहाचे श्री विजय जाधव जिजाऊ कमर्शियल बँकेचे अध्यक्ष श्री अविनाश कोठाळे मिशन आय ए एस.चे सहसंचालक डॉ. गजानन उन्हाळे मिशन आय ए एस चे कार्यकारिणी सदस्य डॉ. रमेश गोटखडे नंदकिशोर खडसे जनसंपर्क अधिकारी श्री चंद्रशेखर आसोले बुलढाणा विभागाचे विभागीय अध्यक्ष श्री स्वप्निल आळेकर विभागीय संचालक श्री श्रीधर जाधव सहसंचालक डॉक्टर गजानन उन्हाळे भंडाऱ्याचे श्री नरेंद्र पालंदुरकर व श्री शंकर पत्रे यांचे सहकार्य लाभले असून या सर्व व्याख्यानांना सर्व जिल्ह्यात उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# माता रमाई जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेत राजलक्ष्मी जाधव प्रथम माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थिनीचा सन्मान





■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरी शालेय व महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथील विद्यार्थिनी राजलक्ष्मी विकास जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल राजलक्ष्मी जाधव हिचा माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथे विशेष सत्कार समारंभ आयोजित करून गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक कैलास घुगे, शाळेचे प्राचार्य मंगेश काशीद, तसेच सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी राजलक्ष्मी जाधव हिला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल ५,००० रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी तिच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राजलक्ष्मी जाधव हिने आपल्या निबंधातून मासाहेब जिजाऊ यांच्या शौर्यगाथा व कथा त्याग, संघर्ष व सामाजिक योगदानाचे प्रभावी मांडणी केली असून, तिच्या विचारशील लेखनशैलीचे परीक्षकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. या यशामुळे माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व स्पर्धात्मक गुणवत्तेचा प्रत्यय पुन्हा एकदा आला असून, शाळेच्या शिक्षकवृंदाने समाधान व्यक्त केले आहे.

# आष्टी येथे 19 ते 23 फेब्रुवारी दरम्यान डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन बीड येथे नियोजन बैठक संपन्न



■ आष्टी (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, आधुनिक शेतीला चालना देण्यासाठी तसेच शेती क्षेत्रात नवनवीन प्रयोग, संशोधन व तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आष्टी येथे दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण व बहुप्रतीक्षित कृषी प्रदर्शनाच्या यशस्वी नियोजनासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या उपस्थितीत बीड येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या दालनात सविस्तर आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत कृषी प्रदर्शनाच्या संपूर्ण नियोजनाबाबत तपशीलवार चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सुधारित वाणांची माहिती, सेंद्रिय व नैसर्गिक शेती, सूक्ष्म सिंचन पद्धती, जलसंधारण, पीक संरक्षण, खत व्यवस्थापन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय तसेच कृषी प्रक्रिया उद्योगाची माहिती प्रत्यक्ष पाहता व समजून घेता यावी, या दृष्टीने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ. स्वामीनाथन यांच्या विचारांवर आधारित हे कृषी प्रदर्शन शेतकरी केंद्रित, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरेल. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, खर्च कमी करणाऱ्या शेती पद्धती आणि बाजारपेठेशी थेट जोड निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजन करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

या उच्चस्तरीय बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. सुभाष साळवे, कृषी उपसंचालक श्री. दादाराव जाधवर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. उद्धव गर्जे, कृषी विकास अधिकारी श्री. साहिल सय्यद, मोहीम अधिकारी श्री. सय्यप्पा गरांडे, तालुका कृषी अधिकारी आष्टी श्री. गोरख तरटे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक श्री. वल्लभ भोसले, कृषी अधिकारी श्री. आंधळे, आत्मा प्रकल्पाचे श्री. राजेंद्र धोंडे, इव्हेंट मॅनेजमेंटचे श्री. अजय वाबळे यांच्यासह कृषी विभागातील विविध अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्रदर्शनातील विविध दालनांची रचना, कृषी यंत्रसामग्री व अवजारे, बी-बियाणे व खते उत्पादक कंपन्यांचा सहभाग, कृषी विद्यापीठांचे संशोधन, शासकीय कृषी योजनांचे स्टॉल, शेतकरी मार्गदर्शन शिबिरे, तज्ज्ञांचे व्याख्यान, यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव कथन, महिलांसाठी बचत गट व कृषी आधारित उद्योग यांचा समावेश करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

तसेच शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, माती परीक्षण, पीक सल्ला, हवामान आधारित शेती मार्गदर्शन, कर्ज व विमा योजनांची माहिती देण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून शेतकऱ्यांना केवळ माहितीच नव्हे तर प्रत्यक्ष लाभ मिळेल, याची विशेष काळजी घेतली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामुळे आष्टी तालुक्यासह बीड जिल्हा व परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची नवी दिशा मिळणार असून, शेती व्यवसाय अधिक शाश्वत व नफ्याचा करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रदर्शनात राज्यभरातून शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# टोकवाडी येथे गुरांच्या आठवडी बाजाराचे उद्घाटन उत्साहात

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने टोकवाडी येथील विस्तीर्ण जागेत नव्याने सुरू करण्यात आलेल्या गुरांच्या आठवडी बाजाराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. पूर्वी हा बाजार वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी भरत होता; मात्र आता बाजार समितीच्या टोकवाडी येथील ८५ एकर जागेत नियमितपणे भरणार आहे.

या नव्या ठिकाणी बाजार समितीच्या वतीने जनावरांसाठी वैरण, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पशुवैद्यकीय आरोग्य सुविधा, तसेच व्यापाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांना अधिक सोयीस्कर वातावरण उपलब्ध झाले आहे.

उद्घाटन कार्यक्रमास माजी आमदार संजयभाऊ दौंड, माजी जिल्हा परिषद सदस्य अजयसेठ मुंडे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, मार्केट कमिटीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक केशव नागरगोजे, ॲड. प्रणव मराठे, अजीजभाई, पिंटू मुंडे, आयुबभाई, दत्ताभाऊ देशमुख, भगवान फड, ॲड. रणजित सोळंके यांच्यासह मार्केट कमिटीचे सर्व संचालक मंडळ सदस्य आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी बाजाराच्या नव्या ठिकाणामुळे वाहतूक कोंडी कमी होईल, जनावरांना उत्तम सुविधा मिळतील आणि व्यापार अधिक सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त केला. यापुढे गुरांचा आठवडी बाजार टोकवाडी येथील बाजार समितीच्या मैदानातच नियमितपणे भरणार आहे, अशी माहिती बाजार समितीच्या वतीने देण्यात आली.



# म.गा.ग्रा.रो.यो. अंतर्गत नवीन कामांना मान्यता बंद

## दलालांच्या व काही कर्मचाऱ्यांच्या आमिषाला बळी न पडण्याचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांचे आवाहन

■ कडा। प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (म.गा.ग्रा.रो.यो.) अंतर्गत सध्या कोणत्याही नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देणे बंद करण्यात आले आहे. यामध्ये जलसिंचन विहीर, शेततळे, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड आदी सर्व कामांचा समावेश आहे.

केंद्र शासनाकडून सदर कामांचे सांकेतांक (वर्क कोड) काढण्याची प्रक्रिया सध्या थांबविण्यात आल्यामुळे नवीन कामांना मंजुरी देता येणार नसल्याची माहिती पंचायत समिती आष्टीचे गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील लाभार्थी व नागरिकांनी कोणत्याही आर्थिक प्रलोभनाला बळी पडू नये तसेच दलालांच्या व काही पंचायत समितीतील कर्मचारी यांच्या आमिषाला बळी पडू नये, असे स्पष्ट आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी केले आहे. याबाबत कोणीही पंचायत समिती आष्टी येथे कोणतेही प्रस्ताव दाखल करू नयेत, असेही त्यांनी आवाहन लाभार्थी व नागरिक यांना केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतचा देवगिरी प्रांतस्तरीय कार्यकर्ता अभ्यासवर्ग सेलू येथे उत्साहात संपन्न..!

**(परळी प्रतिनिधी)**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचा देवगिरी प्रांतस्तरीय कार्यकर्ता अभ्यासवर्ग सेलू येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. हा अभ्यासवर्ग कार्यकर्त्यांसाठी वैचारिक समृद्धी देणारा, आत्मविश्वास वाढवणारा आणि भविष्यातील कार्याला स्पष्ट दिशा देणारा ठरला. अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही केवळ संघटना नसून शोषणमुक्त समाजनिर्मितीचा ठाम आणि सुस्पष्ट विचार घेऊन चालणारी चळवळ आहे, याची प्रकर्षाने जाणीव या अभ्यासवर्गातून झाली.

राष्ट्रीय आयाम प्रमुख अरुण देशपांडे यांनी कार्यकर्त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, कार्यकर्ता हा केवळ आंदोलनात सहभागी होणारा नसून विचारांनी प्रगल्भ, आचरणाने आदर्श आणि कृतीत सक्षम असला पाहिजे. त्यांच्या विचारप्रवर्तक मार्गदर्शनामुळे उपस्थित कार्यकर्त्यांच्या मनावर दीर्घकालीन ठसा उमटला. कार्यकर्ता अभ्यासवर्गाचे महत्त्व अधोरेखित करताना रमेश टाकळकर यांनी संघटनेचा कणा मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण, शिस्त आणि वैचारिक ठामपणा किती आवश्यक आहे, हे प्रभावीपणे स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी संघटनेची उद्दिष्टे, कार्यपद्धती, कायदेशीर चौकट तसेच समाजात काम करताना घ्यावयाची संतुलित व जबाबदार भूमिका याबाबत सखोल मार्गदर्शन केले. हे मार्गदर्शन नव्या कार्यकर्त्यांना दिशा देणारे तर अनुभवी कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवणारे ठरले.

प्रास्ताविकातून डॉ. विलास मोरे यांनी एकसंध विचार, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि समन्वयाने काम करणारे कार्यकर्ते हीच संघटनेची खरी ताकद असल्याचे अधोरेखित केले. या अभ्यासवर्गासाठी विविध जिल्ह्यांतून तब्बल १२५ कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण, अनुभवांची सांगड आणि संघटनात्मक बंध अधिक दृढ झाले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनातून संघटनेतील शिस्त, सौहार्द आणि कार्यसंस्कृती स्पष्टपणे दिसून आली. सेलू येथे पार पडलेला हा अभ्यासवर्ग अत्यंत उत्कृष्ट, शिस्तबद्ध आणि मार्गदर्शक ठरला. या अभ्यासवर्गामुळे उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना ग्राहक चळवळीची सुस्पष्ट सैद्धांतिक भूमिका, सामाजिक जबाबदारी आणि भविष्यातील लढ्यासाठी आवश्यक मानसिक व वैचारिक तयारी मिळाली. या प्रेरणादायी, अभ्यासपूर्ण आणि कृतीशील मार्गदर्शनाबद्दल सर्व मार्गदर्शक, आयोजक आणि संघटनेप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सेलू येथे झालेल्या या परिषदेमुळे सर्व कार्यकर्त्यांना मोलाचे, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी विचार मिळाल्याचे मत सौ. चित्रा देशपांडे यांनी शेवटी व्यक्त केले.





## विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीचा सलग तीन वर्षांचा हॅटट्रिक विजय; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**कडा। प्रतिनिधी**

आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निक आष्टी या महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल संघाने शैक्षणिक वर्ष 2023-24, 2024-25 व 2025-26 मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित G-1 झोन विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सलग तीन वेळा विजेतेपद पटकावत ऐतिहासिक हॅटट्रिक विजय नोंदविला आहे. या दैदीप्यमान यशाच्या जोरावर आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) आष्टीच्या संघाची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या विभागीय स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीच्या संघाने प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट खेळ, संघभावना, शिस्त व तांत्रिक कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात बलाढ्य प्रतिस्पर्धी संघावर मात करत संघाने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. या विजयी १२ खेळाडूंच्या संघाचे नेतृत्व संघनायक ढोले श्रेयश परशुराम यांनी प्रभावीपणे केले. संघात कदम ओंकार अविनाश,शेख नुमान निसार, मुरकुटे गौरव सचिन, मिसाळ ज्ञानेश्वर रामदास, जैदी आमेर इस्लाम, खान साद याह्या, भालेराव महेश विष्णू, मिसाळ शत्रुघ्न मच्छिंद्र, पोकळे युवराज नारायण, मुरकुटे श्रीनाथ संतोष व मिर्झा शोएब आसिफ बेग यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. संघाच्या या यशामागे क्रीडा प्रशिक्षक प्रा. योगेश पवार यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले.

या उल्लेखनीय यशाबद्दल आनंद चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, संचालक डॉ. अजय धोंडे, तसेच प्रशासकीय अधिकारी सर्वश्री डॉ. डी. बी. राऊत, एस. जी. विधाते, डी. झेड. बोडखे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आष्टीचे प्राचार्य प्रा. संजय बोडखे यांनी संघाचे अभिनंदन केले. यावेळी संस्थेअंतर्गत महाविद्यालयांचे प्राचार्य — छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरसूल श्रीराम, महेश आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोसावी, महेश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रागीट सतीशचंद्र, अन्न तंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ मोहळकर आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनीही संघाच्या कामगिरीचे कौतुक करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सलग तीन वर्षांच्या या हॅटट्रिक विजयानिमित्त आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) आष्टीच्या क्रीडा परंपरेला अधिक बळ मिळाले असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही संघ भरीव यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## सियाज् प्रिस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

### प्रा.इंजि. प्रियंका सचिन विधाते यांचे कौतुकास्पद कार्य-सौ. दमयंती भीमराव धोंडे

**आष्टी प्रतिनिधी:**




दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी सियाज् प्रिस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले यावेळी अध्यक्षस्थानी सौ.दमयंती भीमराव धोंडे प्रमुख पाहुणे श्री. भाऊसाहेब भिसे, श्री. परशुराम विधाते, श्री. भाऊसाहेब नवले, श्री .जालिंदर मुळे,सौ. मंजुश्री कुलकर्णी सौ.मंगल शिंदे, सौ.विदया ढेरे, सौ.तेजश्री धंगेकर उपस्थित होत्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वार्षिक पुरस्कार वितरण केले ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध खेळात सहभाग घेतला होता ज्यामध्ये लिंबू चमचा,धावणे, तीन पायाची शर्यत, संगीत खुर्ची, पोत्यामधील उड्या, हस्ताक्षर स्पर्धा , वर्षातील उत्कृष्ट विद्यार्थी याचे वितरण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कलागुण सादर करताना उत्कृष्ट प्रकारे नृत्य सादर केले अभिनय केला व प्रेक्षकांचे मनोरंजन केले. अध्यक्षीय भाषणावेळी सौ.दमयंती धोंडे म्हणाल्या की प्रियंका व सचिन विधाते यांनी सुरू केलेल्या सियाज् प्रि-स्कूलच्या फुलाचा आता गुच्छ झालेला आहे व त्यांची अशीच प्रगती होत राहो अशा शुभेच्छा दिल्या. महिला प्रतिनिधित्व असलेली ही शाळा उत्कृष्ट काम करत आहे, प्रियंका विधाते यांच्या नियोजनात शाळेचे काम उत्कृष्ट होत आहे. ज्याच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज घेऊन मुलांना प्रयोगशील शिक्षण दिले जाते त्यामुळे मुलांच्या बौद्धिक विकासात मदत होते. प्रमुख पाहुणे श्री भाऊसाहेब भिसे त्यांचे मनोगत व्यक्त करताना लहान मुलांना शिकवणे खूप अवघड आहे.

या लहान चिमुकल्यांना उत्कृष्ट प्रकारे नृत्य करायला लावणे म्हणजे तारेवरची कसरत आहे आणि ही कसरत सियाज् प्रिस्कूल खूप तळमळीने पूर्ण करत आहे, याचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी युवा उद्योजक श्री. दिगंबर जोगदंड, श्री. दत्ता बोडखे, श्री. सुरज माने श्री. सुरज मुळे, इंजि.संदीप घोलप, सौ. बबीताताई बोडखे यांनी मुलांचे कौतुक करताना बक्षीस प्रदान केले. या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी सौ. रेश्मा भवर, सौ. रूपाली धोंडे, सौ मोनाली शिंदे , सौ. माया लोखंडे सौ. स्वाती वाघ ,कु. आरती द्वारके, सौ. जागृती धोंडे, सौ. शीतल निकाळजे, श्री गहिनीनाथ शिंदे या पडद्यामागे कलाकारांमुळे कार्यक्रम यशस्वी झाला कार्यक्रमाची सांगतात राष्ट्रगीताने होऊन ,आभार प्रदर्शन शाळेचे संचालक प्रा. इंजि. सचिन विधाते यांनी केले.

## सद्गुरु मुळे परमार्थ ; तर आई-वडिलांमुळे संसार सुखद होतो : ह.भ.प. महारुद्र खाडे महाराज शास्त्री

### स्व.सुलाबाई फड यांनी संस्कार आणि आध्यात्मिक विचारधारा जपल्या

**आष्टी (प्रतिनिधी)**

"जन्म मृत्यू टाळता येत नाही जन्म मृत्यूचे दुःखही टाळता येत नाही.. असे सांगत आयुष्य थोडं मिळावं, पण राजासारखं. आयुष्य किती मिळाले यापेक्षा साध्य काय झाले? हे महत्त्वाचे असून सद्गुरु मुळे परमार्थ यथार्थ होतो; तर आई-वडिलांमुळे संसार सुखाचा होतो!" असे भावोद्गार ज्येष्ठ कीर्तनकार आणि समाज प्रबोधनकार ह.भ.प. महारुद्र खाडे महाराज शास्त्री यांनी काढले.

स्व.सुलाबाई वैजनाथराव फड यांच्या गोड जीवनाच्या निमित्ताने आयोजित कीर्तन सेवेत संत तुकाराम महाराजांच्या "जन्म मृत्यू फार जाले माझ्या जीवा.." या अभंगाचे निरूपण करताना त्यांनी अनेक दृष्टांत देऊन मानवी जीवनाच्या जन्म-मृत्यूच्या वास्तवावर प्रकाश टाकत मौलिक प्रबोधन केले.

धर्मापुरी येथील राम मंदिरामध्ये आयोजित या कीर्तन सेवेप्रसंगी प्रारंभी श्री राम प्रभु आणि स्व. सुलाबाई फड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ह. भ. प. महारुद्र खाडे महाराज शास्त्री पुढे म्हणाले, "संत तुकाराम महाराजांनी प्रस्तुत अभंगातून जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळवण्यासाठी पांडुरंगाला आळवणी केली आहे. यात त्यांनी संसारातील दुःखातून सुटका करण्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना केली आहे. कै.सुलाबाई फड यांनी अत्यंत साधेपणाने आध्यात्मिक आणि संस्कार मय विचारातून पारिवारिक संस्कार केले. त्यांचे विचार भविष्यात सर्वांना उपयोगी ठरतील.. असा विश्वासही ह भ प महारुद्र खाडे महाराज शास्त्री यांनी शेवटी व्यक्त केला. या कीर्तन सेवेला व्यंकटराव फड, अंगद लव्हारे, गणपत किसन फड, लक्ष्मणराव फड, बालाजी फड, डॉ.परमेश्वर फड, भरत चाटे, राजेभाऊ फड सर, ज्ञानोबा मुरकुटे, सौदागरराव चाटे, दत्तात्रय नागरगोजे, विजय मुंडे बार्शीकर, गंगाधरराव फड, बंडू पाटील फड, बामाजी फड, तुकाराम फड, विश्वनाथ फड, महादेव फड, माणिकराव फड, मंचक मुळे, शिवाजी फड, अंगद फड, बाबुराव मुसळे, सुग्रीव मुसळे, वसंतराव फड, पिनू फड, नरसिंग फड, परशुराम फड, हरिदास फड, पप्पू फड, लक्ष्मण फड आदी मान्यवरां सह भाविक भक्त महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. निवृत्ती फड आणि श्रीयुत वाल्मीकराव यांनी पखवाज वादनाची साथ दिली.

**आयुष्य किती मिळाले; यापेक्षा साध्य काय झाले!**

**ह भ प महारुद्र खाडे शास्त्री महाराजांनी अनेक दाखले देत ज्ञानेश्वरांना केवळ सोळा वर्ष आयुष्य मिळाले; परंतु यात त्यांनी ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथाची निर्मिती करून आगाध ज्ञानाचा महिमा निर्माण केला. "आसमान गिर रहा है; बचना है तो भागो.. मरना है तो ठैरो" अशा अनेक विनोदात्मक दृष्टांतातून त्यांनी आयुष्य किती मिळाले यापेक्षा साध्य काय झाले हे महत्त्वाचे असून अत्यंत सुंदर मानवी जीवनातील जन्म-मृत्यू संदर्भातील विवेचन केले.**



## डिजिटल युगातील सर्व बाबींसाठीच्या JNV Collecctives चा शुभारंभ

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**

सोशल मीडियातील घडामोडीत पुढचं पाऊल ठरणाऱ्या डिजिटल मार्केटींग , कॉन्टेन्ट क्रिएशन, इव्हेन्ट तसेच या क्षेत्राशी संबंधित सर्व सेवा उपलब्ध करून देणाऱ्या JNV Collecctive चे उद्घाटन आई सौ विजया प्रशांत दैठणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

जाहिरात क्षेत्रात पदव्यूत्तर प्रशिक्षण आणि विविध कार्पोरेट कंपन्या आणि सोनी टिव्ही वरील मालिकांच्या 5 वर्षांच्या अनुभवानंतर जान्हवी दैठणकर यांनी या क्षेत्रात स्वतंत्रपणे पाऊल टाकले आहे. याचा उद्घाटनाचा कार्यक्रम त्यांच्या मातोश्री विजया दैठणकर यांच्या हस्ते साध्या सोहळ्यात पार पडला. छत्रपती संभाजीनगर शहर तसेच विभागात दर्जेदार कॉन्टेन्ट आणि डिजिटल मार्केटींगसाठी आपण सुरूवात केली असून आगामी काळात सर्वांच्याच जीवनाचा अविभाज्य घटक बनणाऱ्या या क्षेत्रात अचूक आणि तत्पर सेवा देण्याचा मनोदय जान्हवी दैठणकर यांनी व्यक्त केला.



## कै. डॉ. मंचकराव नरहरराव देशमुख यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीर रुग्णाचा मोठा प्रतिसाद

**परळी ( प्रतिनिधी)**

डॉ राहुल देशमुख यांचे वडील कै. मंचकराव नरहरराव देशमुख यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीरचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. हरिश्चंद्र दादा वंगे , उद्घाटक म्हणून परळी शहर पोलीस स्टेशनचे पी.एस. आय. मा .अमोल शिंगणे साहेब, डॉ विवेक दंडे, डॉ अंदुरे साहेब, डॉ बालासाहेब भोसले साहेब, डॉ.राहुल देशमुख साहेब , सौ. साधना राहुल देशमुख आदी मान्यवरांची उपस्थित शिबिराचे उद्घाटन समारंभ देशमुख ॲक्युपंक्चर सेंटर देशमुख कॉम्प्लेक्स , गणेश पार परळी वैजनाथ येथे पार पडला.

डॉ.राहुल देशमुख यांचे वडील कै. डॉ.मंचकराव नरहरराव देशमुख यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीरास रुग्णाचा मोठा प्रतिसाद मिळाला या शिबिरात अर्धांगवायू पॅरलेसिस, मणक्यामध्ये नस दबणे, पाय बधीर होणे ,सांधे वात, तळपायाची जळजळ होणे,टाच दुखी, फ्रोझन शोल्डर,( हात दुखणे) स्पानडिलायटीस , हातांना मुंग्या येणे ,(आग होणे), कंबर मान दुखणे,पाट दुखणे, अंगावर सुज येणे, डोकेदुखी पायाची नस फुगणे, स्नायू आखडणे,करख भरणे,जुनाट सर्दी, लहान मुलांचे व्यंग , मती मंद मुलं, वजन कमी करणे सियाटिका, स्पोर्ट्स इंजुरी, चक्कर येणे,लिंगोमेंट इंजुरी, उंची वाढवणे, लहान मुलांचे मान न धरणे , आदी प्रकारचे उपचार डॉ राहुल देशमुख ॲक्युपंक्चर कायरोप्रॅक्टिक तज्ञ , सौ. साधना राहुल देशमुख ॲक्युपंक्चर थेरपिस्ट यांच्या वतीने करण्यात आले.

दिनांक ८ व ९ फेब्रुवारी 2026 रविवारी, सोमवार रोजी सकाळी दहा ते पाच वाजता शिबिर उत्साहात संपन्न झाला. या शिबिरात डॉ राहुल देशमुख, सौ साधना राहुल देशमुख यांनी सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले या शिबिरासाठी जवळपास २३० रूग्णांची या शिबिरात सहभागी होऊन मोफत शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात रुग्णांनी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याबद्दल डॉ. राहुल देशमुख सौ .साधना राहुल देशमुख यांचे आभारही मानले.




## पूर्व उपनगराला १८ वर्षांनंतर लाभला महापौर

**मुंबई : वृत्तसंस्था**

मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपच्यावतीने रितू तावडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून या प्रतिस्पर्धी पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल न केल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. येत्या बुधवारी या निवडणुकीची औपचारिकता पार पाडली जाईल. रितू तावडे या पूर्व उपनगरातील घाटकोपर पूर्व भागातील असून तावडे यांच्या रुपातून पश्चिम उपनगराला तब्बल १८ वर्षांनंतर महापौर लाभणार आहे. यापूर्वी सन २००५-०७ या कालावधीत पूर्व उपनगरातून दत्ता दळवी हे शेवटचे महापौर झाले होते.

मुंबईच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी येत्या बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे.. यासाठी शनिवारी ०७ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल केले. ही निवडणूक बिनविरोध असल्यामुळे महापौरपदी रितू तावडे आणि उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड होणार आहे .

रितू तावडे यांच्या रुपात पूर्व उपनगराला तब्बल १८ ते २० वर्षांनी महापौर लाभला आहे. सन १९९६-९७ पासून सन २०२२ पर्यंत तत्कालिन शिवसेनेचे महापौर निवडून येत असून या कालावधीमध्ये एकमेव महापौर हा पूर्व उपनगरातील लाभला आहे. सन २००५-२००७मध्ये पूर्व उपनगरातील विक्रोळीतील नगरसेवक दत्ता दळवी यांची निवड करण्यात आली होती. या कालावधीमध्ये सात महापौर हे शहर भागातील होते . तर तीन महापौर हे पश्चिम उपनगरातील होते.



कॉंग्रेसच्या सन १९९२ ते ९७च्या काळातील चार महापौरांपैंकी चारही महापौर पनगरातील होते.. यामध्ये तीन महापौर पूर्व उपनगराचे आणि एक महापौर पश्चिम उपनगरातील होते.



# परळीत ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा

## - भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते

**32 एकर विस्तीर्ण जागेवर भव्य आयोजन | 1300 पेक्षा जास्त पशुधन एकाच ठिकाणी | 13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी | 'महापशुधन एक्स्पो-2026'**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात येत असलेल्या 'महापशुधन एक्स्पो-२०२६' या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील आणि देशातील पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून आयोजित करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या परळी वैद्यनाथ येथील देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व सर्व पदाधिकारी यांनी केले.

परळी वैद्यनाथ नगरीत होणारे राष्ट्रीय पशुप्रदर्शन महाशिवरात्री निमित्त ठरणार महापर्वणीआहे. राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून दिनांक 13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान वैद्यनाथ नगरीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील पशु प्रदर्शन संपन्न होत असून परळी वैजनाथ ही प्रभु वैद्यनाथांची भूमी आहे. या पावनभूमीत १३ ते १५ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान 'महापशुधन एक्स्पो-2026' चे आयोजन करीत आहोत. आपल्या शेतकऱ्यांच्या दारात देशातलं सर्वोत्तम तंत्रज्ञान व जातीवंत पशुधन दिसलं पाहिजे, अशी यामागची संकल्पना आहे. हे देशातील पशुसंवर्धन विभागाचे सर्वात मोठे प्रदर्शन असणार आहे, जे जवळपास ३२ एकरांच्या भव्य परिसरात होणार आहे. याचा मुख्य उद्देश हाच आहे की, आपल्या शेतकऱ्यांना व बेरोजगारांना दूध, मांस, अंडी उत्पादनाची नवीन माहिती मिळावी आणि त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास व्हावा. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट मिळणार आहे.

महापशुधन एक्स्पो-२०२६' या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन समारंभ शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी, २०२६ । सकाळी ११:०० वाजता मा. ना. श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते होणार तर बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२६ | दुपारी १:०० वाजता मा. ना. श्री. देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते होणार आहे. सन्माननीय उपस्थिती मा. ना. श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्रीमती सुनेत्रा अजित पवार उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड, मा. ना. श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. अतुल लिलावती मोरेश्वर सावे मंत्री, दुग्धविकास व इतर मागास बहुजन कल्याण, मा. ना. श्री. नितेश नीलम नारायण राणे मंत्री, मत्स्य व्यवसाय व बंदरे यांची उपस्थित लाभणार आहे. महापशुधन एक्स्पो २०२६ प्रमुख वैशिष्ट्ये एकूण ३२ एकर विस्तीर्ण जागेवर भव्य आयोजन, पशुसंवर्धनाशी संबंधित ३०० पेक्षा जास्त माहितीपूर्ण स्टॉल्स, विविध जातीवंत पशुप्रजातींचे १३०० पेक्षा जास्त पशुधन एकाच ठिकाणी पाहण्याची संधी., उत्कृष्ट जातीच्या देशी व संकरीत गायी-म्हशींचे विशेष प्रदर्शन., पेट शो, मुक्तसंचार गोठा व अर्धबंदिस्त शेळीपालन यासारख्या आधुनिक पशुपालन पद्धतींचे दर्शन. परसातील कुक्कुटपालन व विविध कुक्कुट प्रजाती एकाच छताखाली पाहण्याची संधी. विविध प्रकारच्या चारा पिकांच्या लागवडीबाबत मार्गदर्शन., पशुसंवर्धनातील विविध विषयांवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत माहितीपूर्ण चर्चासत्रे., शासनाच्या विविध योजनांचे थेट सादरीकरण व मार्गदर्शन. पशूंचे प्रदर्शन न राहता, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी एक दिशादर्शक मंच ठरावा. प्रदर्शनात येणाऱ्या पशुपालकांची गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. या प्रदर्शनामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, शेतकरी / पशुपालकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणार आहे.

परळी वैद्यनाथच्या नगरीतील इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे. विशेष योगायोग म्हणजे महाशिवरात्रीच्या पर्वकाळात पशुपालकांसाठी देशपातळीवरील पशुप्रदर्शन ही महापर्वणी ठरणार आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या परळी वैद्यनाथ येथील देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व सर्व पदाधिकारी यांनी केले.

# आष्टी येथे 19 ते 23 फेब्रुवारी दरम्यान डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन बीड येथे नियोजन बैठक संपन्न

**आष्टी | प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, आधुनिक शेतीला चालना देण्यासाठी तसेच शेती क्षेत्रात नवनवीन प्रयोग, संशोधन व तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आष्टी येथे दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण व बहुप्रतीक्षित कृषी प्रदर्शनाच्या यशस्वी नियोजनासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या उपस्थितीत बीड येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या दालनात सविस्तर आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत कृषी प्रदर्शनाच्या संपूर्ण नियोजनाबाबत तपशीलवार चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सुधारित वाणांची माहिती, सेंद्रिय व नैसर्गिक शेती, सूक्ष्म सिंचन पद्धती, जलसंधारण, पीक संरक्षण, खत व्यवस्थापन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय तसेच कृषी प्रक्रिया उद्योगाची माहिती प्रत्यक्ष पाहता व समजून घेता यावी, या दृष्टीने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ. स्वामीनाथन यांच्या विचारांवर आधारित हे कृषी प्रदर्शन शेतकरी केंद्रित, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरेल. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, खर्च कमी करणाऱ्या शेती पद्धती आणि बाजारपेठेशी थेट जोड निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजन करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

या उच्चस्तरीय बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. सुभाष साळवे, कृषी उपसंचालक श्री. दादाराव जाधवर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. उद्धव गर्जे, कृषी विकास अधिकारी श्री. साहिल सय्यद, मोहीम अधिकारी श्री. सय्यप्पा गरांडे, तालुका कृषी अधिकारी आष्टी श्री. गोरख तरटे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक श्री. वल्लभ भोसले, कृषी अधिकारी श्री. आंधळे, आत्मा प्रकल्पाचे श्री. राजेंद्र धोंडे, इव्हेंट मॅनेजमेंटचे श्री. अजय वाबळे यांच्यासह कृषी विभागातील विविध अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान प्रदर्शनातील विविध दालनांची रचना, कृषी यंत्रसामग्री व अवजारे, बी-बियाणे व खते उत्पादक कंपन्यांचा सहभाग, कृषी विद्यापीठांचे संशोधन, शासकीय कृषी योजनांचे स्टॉल, शेतकरी मार्गदर्शन शिबिरे, तज्ज्ञांचे व्याख्यान, यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव कथन, महिलांसाठी बचत गट व कृषी आधारित उद्योग यांचा समावेश करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

# कर्जतच्या आदर्श पत्रकार संघ पुरस्कार कार्यक्रमाला उपस्थित रहा

**विभागीय सचिव रवी उबाळे, समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांचे आवाहन**






**बीड/ प्रतिनिधी**

मराठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पत्र महर्षी रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजीनगर विभागाचे विभागीय सचिव रवी उबाळे विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण कर्जत येथे दिनांक 22 फेब्रुवारी रोजी रविवारी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन मध्ये सकाळी 11 वाजता आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख सर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला संभाजीनगर विभागातील सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाने उपस्थित राहावे असे आवाहन संभाजीनगरचे विभागीय सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले.



# महागाव तालुक्यातील (प्रबोधनी प्रकल्प) धनोडा येथे “अर्थसंकल्प 2026 महिला संमेलन”

**महागांव | प्रतिनिधी**



देशाच्या यशस्वी अर्थमंत्री मा. ना. श्रीमती निर्मलाताई सितारामन यांनी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प 2026 च्या पार्श्वभूमीवर, महागाव तालुक्यातील (प्रबोधनी प्रकल्प) धनोडा येथे “अर्थसंकल्प 2026 महिला संमेलन” अत्यंत उत्साहात व प्रभावी वातावरणात संपन्न झाले.

महिला सक्षमीकरणाचा मजबूत पाया घालणाऱ्या मा. चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. आरतीताई फुपाटे होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा जिल्हा समन्वयक मा. नितीनजी भाऊ भुतडा, मा. विद्यमान आमदार किसनरावजी वानखेडे, मंडळ अध्यक्ष योगेश जी वाजपेयी, श्रीधर बामनकर विलासराव कवाने सुनील टेमकर धनोडा येथील सरपंच उज्वलाताई भारती रामुनाईक मामा सुरेश खंदारे मनीषा ताई काळेश्वर कर आशाताई देवसरकर अस्मिता आढावे उपस्थित होते.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक आदरणीय महेशजी काळेश्वरकर यांनी केंद्रीय अर्थसंकल्प 2026 मधील महिलांसाठीच्या योजनांची सविस्तर व सोप्या भाषेत माहिती दिली. महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी सरकारने घेतलेले निर्णय, रोजगार, आरोग्य, शिक्षण व आर्थिक सक्षमीकरणावरील तरतुदी यावर त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

संमेलनास महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रम यशस्वी केला. हा कार्यक्रम महिलांमध्ये जागृती निर्माण करणारा व संघटन अधिक मजबूत करणारा ठरला.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सौ. जयश्री सुनील राठोड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविताताई राऊत यांनी केला तर आभार प्रदर्शन ज्योती कांबळे यांनी केला, कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

